# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २१/०१/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. कोंढाळी** :- अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा विकास नगर कोंढाळी येथे दिनांक १७/०१/२२ चे ११.०० ते दिनांक २०/०१/२०२२ चे १३.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे- प्रीतम युवराज खांडेकर वय ४२ वर्ष रा. विकास नगर, कोंढाळी तालुका काटोल जिल्हा नागपूर यांचे घराचे दाराचे अज्ञात आरेपीने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी कपाटात ठेवलेले सोने व चांदीचे दागिने असा एकुण कि. ४९,२००/- रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री राम ढगे मो.नं. ९५१८९७९४९९ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. भिवापुर** :- अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील मौजा सोनेझरी नगर, ता. उमरेड येथे दिनांक ०८/०१/२२ चे १९.०० वा ते ०९/०१/२०२२ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- सुधीर मधुकर भोयर, वय ४४ वर्ष सोनेझरी नगर ता. उमरेड याने आपल्या शेतातील कापुस मजुरांच्या हातानी काढुण शेतातील कोटयात ६ ते ७ क्विटंल कापुस ठेवला व कोठयाला कुलुप लावुन ठेवले होते. त्यादरम्यान आरोपी नामे- किसना काशीनाथ येले, रा. सरांडी ता. भिवापुर याने आपल्या साथीदाराच्या मदतीने कोठयाचा दरवाजा तोडुन ६ ते ७ क्विटंल कापुस कि. ६०,०००/- रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास राजेंद्र डहाके मो.नं. ९८२३५१७४१२ हे करीत आहे.

# फसवणुक

१) पो.स्टे. काटोल :- अंतर्गत १ कि मी अंतरावर दूयम निबंधक कार्यालय काटोल येथे दिनांक १५/०१/२०१८ चे १४.३० वा. दरम्यान आरोपी नामे- उमेश विजय ढोले वय ५० वर्ष, रा. कारंजा घाडगे जि. वर्धा याने फिर्यादी नामे- गजानन शामराव बैंगन, वय ५४ वर्ष, रा. कारंजा घाडगे, जि. वर्धा यांना प्लॉट विक्री करून देण्याचे आधी फिर्यादीस माहीत पडले की, आरोपीने व्यवहार करून १. सुशिला सुखदेव चैन्ने, रा. काटोल, २. निशीकांत देविदास क्षीरसागर रा. भिष्णूर व ३. अरविंद अंबादास पिसे, रा. फैलपूरा काटोल यांना सदरचा प्लॉट विक्री केलेला होता. यावरून फिर्यादीने दूयम निबंधक कार्यालय काटोल यांचे कार्यालयमधून माहिती प्राप्त केली. तसेच सदर प्लॉट संबधाने झालेल्या व्यवहारा बाबतचे दस्ताऐवज प्राप्त केले. सदरचे दस्ताऐवज प्राप्त झाल्यानंतर फिर्यादीने दस्ताऐवजची पडताळणी केली असता आरोपी यांने या व्यवहारामधून सदरचा प्लॉट हा आगोदरच सन २००७ मध्ये वरील लोकांना विक्री केलेला असतांना व त्याबाबतची त्याला माहिती असतांना फिर्यादीची या प्लॉटचे व्यवहारामधून फसवणुक केलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४१७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री परमेश्वर आगासे हे करीत आहे.

२) पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत ८ कि. मी. अंतरावरील इंडीकेश बॅक एटीएम दहेगाव चौरस्ता येथे दिनांक २०/०१/२२ चे १५.०० वा. ते १५.२० वा. दरम्यान फिर्यादी नामे- सुरेश चंद्र पंचम, वय ४२ वर्ष, रा. वलनी माईन, खापरखेडा हे इंडीकेश एटीएम मध्ये पैसे काढण्याकरीता गेले. त्यांनी एटीएम मधुन ५,०००/-रू. काढले एटीएम कार्ड परत एटीएम मध्ये ठेवुन पैसे मोजीत असतांना त्यांचे एटीएम कार्ड एटीएम रूममध्ये उभे असलेले ०२ इसम त्यापैकी एका अज्ञात ईसमाने हातचालाखीने उचलुन त्याने दुसरे एटीएम कार्ड घेवुन जावुन ०२ वेळा १०,०००/-रू. असे एकुण कि. २०,०००/-रू. काढुन घेत फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम मो नं.७३५०९८५३७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर